जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ८०८ दिनांक - १४/११/२०२३**

पी.सी.बी.गुन्हे शाखा पुणे शहर

## खडक पोलीस ठाणे परिसरात दहशत माजविणा-या,अट्टल गुन्हेगारावर मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांची एम.पी.डी.ए. कायद्यान्वये स्थानबध्दतेची कारवाई

पुणे पोलीस आयुक्तालयातील खडक पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये गुन्हे करणारा अट्टल गुन्हेगार नामे **नजीर सलीम शेख,वय २९ वर्षे रा.हनुमान मंदिराजवळ,कासेवाडी भवानी पेठ,पुणे** हा अभिलेखावरील सराईत गुन्हेगार आहे. त्याने साथीदारांसह खडक पोलीस स्टेशनच्या हद्दीत तलवार, कोयता, चाकू या सारख्या जीवघेण्या घातक हत्यारांसह खुनाचा प्रयत्न, सरकारी नोकरांवर हल्ला करणे, सरकारी कामात अडथळा, बेकायदेशीर हत्यार बाळगण यासारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे केले आहेत. **मागील ०५ वर्षामध्ये त्याचेविरूध्द ०५ गुन्हे दाखल आहेत.** त्याच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे सदर परिसरातील सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण झालेली होती. तसेच त्याच्यापासून जीविताचे व मालमत्तेचे नुकसान होईल या भितीमुळे नागरिक उघडपणे तक्रार करणेस धजावत नव्हते.

प्राप्त प्रस्ताव व सह कागदपत्रांची पडताळणी करुन,**मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, यांनी नमूद इसमाचे विरुध्द एम.पी.डी.ए.कायद्यान्वये अमरावती मध्यवर्ती कारागृह,अमरावती येथे ०१ वर्षाकरीता स्थानबध्दतेचे आदेश पारीत केले आहेत.** नमूद इसमास स्थानबध्द करण्यामध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक,खडक पोलीस स्टेशन पुणे,श्री.सुनिल माने व त्यांचे अधिपत्याखालील पोलिस अधिकारी व पोलिस अमंलदार तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक,पी.सी.बी.गुन्हे शाखा,पुणे,श्री.ए.टी.खोबरे आणि अधिपत्याखालील पोलिस अधिकारी व पोलिस अमंलदार यांनी सदरची कामगिरी केली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांनी दहशत निर्माण करणाा व सक्रिय अट्टल गुन्हेगारांवर कडक प्रतिबंधक कारवाई करण्याचे धोरण अवलंबिले आहे. **मा.पोलीस आयुक्त यांनी कार्यभार स्वीकारले नंतरची एम.पी.डी.ए. कायद्यान्वये स्थानबध्दतेची ही ५५ वी कारवाई असुन**, यापुढेही सराईत व अट्टल गुन्हेगारांचे कृत्यांना आळा घालण्यासाठी प्रभावी प्रतिबंधक कारवाई करण्यात येणार आहे.